नवीन सहकारी सूतगिरण्या अर्थसहाय्यासाठी घेण्याबाबत एकवाक्यता येण्याकरीता निकष ठरविण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र.सूतगि-३३२५/प्र.क्र.६९/टेक्स-१ (अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६ मार्च, २०२६

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक आविम-१०९६/प्र.क्र.१४३/का.३, दिनांक १४.१०.१९९८
२) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक एमपीसी-१०९९/ प्र.क्र.२४४/विघयो-२ दिनांक ३०.०३.२०००
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दिनांक ०२.०६.२०२३
४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक MTD-२४०२६/११/२०२४-MTD (Desk३) दिनांक १३.०८.२०२४
५) शासन निर्णय, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, क्रमांक सूतगी-२०२४/ प्र.क्र.२०४/ योजना-२, दिनांक २८.०८.२०२४
६) शासन निर्णय, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, क्रमांक सूतगी-२०२०/ प्र.क्र.७३/ शिक्षण, दिनांक ०३.०९.२०२४

<u>प्रस्तावना :-</u>

सहकारी सूतगिरण्यांनी ग्रामीण औद्योगिकीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावून ग्रामीण भागातील कामगारांना अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करून राज्यातील सामाजिक-आर्थिक बदल सुरू करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. राज्यातील सर्वसाधारण प्रवर्गातील सहकारी सूतगिरण्यांना वस्त्रोद्योग विभागाद्वारे, मागासवर्गीय प्रवर्गातील सूतगिरण्यांना सामाजिक न्याय विभागाद्वारे ,राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सहकारी सूतगिरण्यांना आदिवासी विकास विभाद्वारे व इतर मागास व बहुजन कल्याण विभागाद्वारे राज्यातील भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य प्रदान करण्यात येते.

राज्यातील विविध प्रवर्गातील सहकारी सूतगिरण्यांना संबंधित विभागाद्वारे शासकीय भागभांडवल प्रदान करण्यात येत असले तरी राज्यातील सहकारी सूतगिरण्यांबाबचे धोरण एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अन्वये निश्चित करण्यात आले असून सदर धोरणात झोननिहाय सभासद भागभांडवल, शासकीय भागभांडवल आणि वित्तीय संस्थांकडून घेण्यात येणारे

कर्ज यांचे गुणोत्तर ठरविण्यात आले आहे. तथापि, इतर विभागांच्या संबंधित प्रवर्गातील सहकारी सूतगिरण्यांना प्रदान करावयाच्या शासकीय अर्थसहायाच्या गुणोत्तरात व एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या झोननिहाय गुणोत्तरात एकवाक्यता येण्याकरीता निकष ठरविण्यासाठी आयुक्त वस्त्रोद्योग यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करावी असे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेले आहेत. तसेच राज्यात वस्त्रोद्योग विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागास व बहुजन कल्याण विभागाद्वारे अर्थसहाय्यासाठी घेण्यात येणा-या सहकारी सूतगिरण्यांसाठी बृहद आराखडा (Master plan) तयार करणे आवश्यक आहे. सबब, वस्त्रोद्योग विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, बहुजन कल्याण विभागामार्फत नवीन सहकारी सूतगिरण्या अर्थसहाय्यासाठी घेण्याबाबत एकवाक्यता येण्याकरीता निकष ठरविण्यासाठी व राज्यातील सहकारी सूतगिरण्यांसाठी बृहद आराखडा (Master plan) तयार करण्यासाठी आयुक्त वस्त्रोद्योग यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील नवीन सहकारी सूतगिरण्यां वस्त्रोद्योग विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत अर्थसहाय्यासाठी घेण्याबाबत एकवाक्यता येण्याकरीता निकष ठरविण्यासाठी व राज्यातील सहकारी सूतगिरण्यांसाठी बृहद आराखडा (Master plan) तयार करणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:

| | | |
|---|---|---|
| १. आयुक्त, वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर | : | अध्यक्ष |
| २. आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पुणे | : | सदस्य |
| ३. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक | : | सदस्य |
| ४. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पुणे | : | सदस्य |
| ५. सहआयुक्त (प्रशासन), वस्त्रोद्योग आयुक्तालय, म.रा. नागपूर | : | सदस्य |

२. उपरोक्त समितीने राज्यातील नवीन सहकारी सूतगिरण्यां अर्थसहाय्यासाठी घेण्याबाबत एकवाक्यता येण्याकरीता व राज्यातील सहकारी सूतगिरण्यांसाठी बृहद आराखडा(Master plan) तयात करणेबाबत आपला अहवाल सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून **३ महिन्यात** शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३१६१२१४३७०४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHITRA RAVINDRA BISEN

Digitally signed by CHITRA RAVINDRA BISEN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=F789A84DB3CD4420E2DB86C40DF943D84A7873BDE6B53430A5E3B150B091368E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0BD6EA041CD6F49090B004C64DAAE9708BF029C76F9B139C454C2A8EA66C7EA3, cn=CHITRA RAVINDRA BISEN
Date: 2026.03.16 12:15:24 +05'30'

**(चित्रा बिसेन)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स. मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग व गृह निर्माण विभाग ) यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव मंत्रालय, मुंबई
३) मा.उपमुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क) यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मंत्री (आदिवासी विकास विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मंत्री (इतर मागास व बहुजन कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव ( वस्त्रोद्योग विभाग) यांचे स्वीय सहायक, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे स्वीय सहायक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव (आदिवासी विकास विभाग) यांचे स्वीय सहायक, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव (इतर मागास व बहुजन कल्याण) यांचे स्वीय सहायक, इतर मागास व बहुजन कल्याण, मंत्रालय, मुंबई.
१२) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१३) आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पुणे
१४) आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
१५) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पुणे
१६) निवड नस्ती (टेक्स-१ (अ) / टेक्स-१ (ब))